# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक १४/०७/२०१७**

**सायं ४.३० वा.**

| अनु. क्र. | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/०६/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/०६/२०१७ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहेत.<br>अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २. | प्रश्नोत्तरे | प्रश्नोत्तरे हा विषय या सभेसाठी निरंक आहे. |
| ३. | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव. | सदरचा विषय माहितीस्तव आहे. |
| ४. | स्थायी समितीच्या सदस्यपदी असलेले १) श्री. नितीन दिनानाथ राऊत २) श्री पंकज भास्कर ठाकूर ३) श्रीमती छाया धर्मदत्त पाटील ४) श्री प्रशांत दत्तात्रेय राऊत ५) श्री चंद्रकात यशवंत गोरिवले ६) श्री सुनिल मोरेश्वर आचोळकर ७) श्री समीर जीकर डबरे ८) श्री किशोर गजानन पाटील हे निवृत्त होत | ठराव/ निर्णय :- स्थायी समितीवरील रिक्त झालेल्या सदस्यांच्या जागी खालील सदस्यांची शिफारस प्राप्त झाली असल्याने खालील सदस्यांची स्थायी समितीचे सदस्य म्हणून नेमणूक करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.<br><br>अ.क्र / सदस्यांचे नाव:<br>१ सुषमा संजय लोपीस<br>२. किशोर नाना पाटील<br>३. दिक्षा दिपेश घरत<br>४. कन्हैया (बेटा) मनोहर भोईर<br>५. विद्या चेतन पाटील<br>६. वैभव सुदाम पाटील<br>७. सखाराम शंकर महाडिक<br>८. महेश हरी पाटील<br><br>सबब उपरोक्त ०८ सदस्यांची दि. ०१/०८/२०१७ दुपारनंतर स्थायी समितीचे सदस्य म्हणून नेमणूक करण्यास ही सभा मान्यता प्रदान करीत असून १६ सदस्यीय स्थायी समिती खालील प्रमाणे आहे. |

<table>
<tr>
<td></td>
<td>असल्याने त्यांच्या रिक्त होणाऱ्या ०८ जागांवर, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) अन्वये स्थायी समिती सदस्य म्हणून नव्याने नेमणूका करणे.</td>
<td>
<table>
<tr><th>अ.क्र</th><th>सदस्यांचे नाव</th></tr>
<tr><td>१</td><td>उमेश दत्तात्रेय नाईक</td></tr>
<tr><td>२.</td><td>सुदेश प्रभाकर चौधरी</td></tr>
<tr><td>३.</td><td>वृंदेश (उमा) रघुनाथ पाटील</td></tr>
<tr><td>४.</td><td>पंकज पदमाकर पाटील</td></tr>
<tr><td>५.</td><td>अजित यशवंत नाईक</td></tr>
<tr><td>६.</td><td>राजेंद्र राजाराम काबंळी</td></tr>
<tr><td>७.</td><td>अफिफ जमिल शेख</td></tr>
<tr><td>८.</td><td>स्वप्निल अविनाश बांदेकर</td></tr>
</table>
<table>
<tr><th>अ.क्र</th><th>सदस्यांचे नाव</th></tr>
<tr><td>९.</td><td>सुषमा संजय लोपीस</td></tr>
<tr><td>१०.</td><td>किशोर नाना पाटील</td></tr>
<tr><td>११.</td><td>दिक्षा दिपेश घरत</td></tr>
<tr><td>१२.</td><td>कन्हैया (बेटा) मनोहर भोईर</td></tr>
<tr><td>१३.</td><td>विद्या चेतन पाटील</td></tr>
<tr><td>१४</td><td>वैभव सुदाम पाटील</td></tr>
<tr><td>१५.</td><td>सखाराम शंकर महाडिक</td></tr>
<tr><td>१६.</td><td>महेश हरी पाटील</td></tr>
</table>
अनुमोदक :- (रमेश घोरकना) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर.
</td>
</tr>
<tr>
<td>५.</td>
<td>मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१९ दिनांक २०/०१/२०१६ बाब क्र २९ व ३० क्रिडा अनुदान देणेबाबतच्या नियमावलीमध्ये तसेच अनुदानामध्ये अंशत बदल करुन नव्याने धोरण निश्चित करणे<br><br>वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील राज्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडूना यांना रोख बक्षिस देऊन गौरविण्याच्या योजनेची नियमावली.</td>
<td>प्रस्तावाचा निर्णय / ठराव :- प्रस्तावात नमुद वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू यांना रोख बक्षिस देऊन गौरविण्याच्या योजनेची नियमावलीच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यांत आली त्यानुसार,प्रस्तावातील नमुद अ.क्र.29 व अ.क्र.30 मधील बाब अ,ब, क,ड व इ प्रमाणे मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.19 दिनांक.20/01/2016 नुसार नियमावली मंजुर असून सदर नियमावली व त्यानुसार द्यावयांचे अनुदानात बदल करुन परिशिष्ठ "अ,ब,क व ड" यामध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे अनुदानांचा प्रकार व खेळाडूस द्यावयाचे अनुदानास आजची ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. त्याच प्रमाणे प्रस्तावातील परिशिष्ठ "इ" मध्ये अनुदान पात्रतेचे निकष प्रस्तावीत केलेले आहेत त्या निकषास ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे. परिशिष्ट "ई" मध्ये महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने विहित केलेले भारतीय खेळ महासंघ पुरस्कृत क्रीडा स्पर्धांमधील खेळांचा उल्लेख प्रस्तावात करण्यांत आला आहे. प्रस्तावातील नमुद स्पर्धाप्रकारांना खेळांना अनुदान देणेसाठी ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. तसेच प्रस्तावातील नमुद परिशिष्ठ "उ" परिशिष्ठ (ई) मध्ये महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने शासन निर्णयानुसार विहित केलेले भारतीय खेळ महासंघ पुरस्कृत क्रीडा स्पर्धांमधील खेळाचा उल्लेख आहे. याव्यतिरिक्त इतर क्रिडा स्पर्धाप्रकार ज्यांचा परिशिष्ठ (ई) मध्ये उल्लेख नाही, अशा स्पर्धा प्रकारांचे महापालिकेने त्या-त्या वेळी आयोजन करुन या स्पर्धांमध्ये विजेता स्पर्धकांना प्रोत्साहनपर पारितोषिके देऊन महानगरपालिकेकडून त्यांचा गौरव करण्यांत यावा, यासाठी अशा स्पर्धांचे विविध स्तरावर आयोजन करावे यासाठी ही सभा ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | याप्रस्तावाच्या अनुषंगाने दाखल केलेल्या उपसुचनांचा विचार करिता खालील उपसुचनांचा या ठरावात अंतर्भाव करणेंस व त्यांची अंमलबजावणी करणेंस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br>उपसुचना क्र.1 नुसार<br>प्रस्तावातील परिशिष्ट (ब) मधील अ.क्र.4 यामधील मास्टर्स ॲथलेटीक्स क्रीडा स्पर्धा असे नमुद आहे. त्याऐवजी मास्टर्स क्रीडा स्पर्धा अशी दुरूस्ती करणेच्या उपसुचनेस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br>उपसुचना क्र.2 नुसार<br>प्रस्तावातील नमुद परिशिष्ट (ब) मधील अ.क्र.5 मध्ये जागतिक (वर्ल्ड मास्टर्स गेम्स) मास्टर्स ॲथेलेटिक्स क्रीडा स्पर्धेमध्ये पदक विजेता व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतू कोणतेही पदक मिळवू न शकणा-या स्पर्धकांना प्रोत्साहन पर अनुदान असे नमुद आहे.<br>त्याऐवजी अधिकृत राज्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटना यांच्या सहभागाने व मान्यतेने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये पदक विजेता व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पदक मिळवू न शकणा-या स्पर्धकाना प्रोत्साहन पर अनुदान अशी दुरूस्ती करणेच्या उपसुचनेस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br>उपसुचना क्र.3 नुसार<br>सदर प्रस्तावातील परिशिष्ठ ब, क. ड व ई यामधील क्रीडा स्पर्धेत विजेत्या खेळाडुंच्या मार्गदर्शकांना द्यावयाचे अनुदान<br>✓ परिशिष्ट (ब) अ.क्र.1 व 2 या मधील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकांच्या क्रिडा मार्गदर्शक यांना रुपये 10,000/- अनुदान.<br>✓ परिशिष्ट (ब) अ.क्र.1 व 2 या मधील आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकांच्या क्रिडा मार्गदर्शक यांना रुपये 15,000/- अनुदान.<br>✓ अ.क्र.4 मधील आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकाच्या क्रिडा मार्गदर्शक यांना रुपये 15,000/- अनुदान,<br>✓ अ.क्र.5 मधील सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकाच्या क्रिडा मार्गदर्शक यांना रुपये 15,000/- अनुदान,<br>✓ अ.क्र.6,7,9 व 10 यामधील सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकाच्या क्रिडा मार्गदर्शक यांना रुपये 20,000/- अनुदान,<br>✓ अ.क्र.8 व 11 यामधील सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकाच्या क्रिडा मार्गदर्शक यांना रुपये 30,000/- अनुदान,<br>✓ अ.क्र.12 यामधील सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकाच्या क्रिडा मार्गदर्शक रुपये 50,000/- अनुदान, |

तसेच परिशिष्ट (क) सांघिक स्पर्धा यामधील

- ✓ परिशिष्ट (क) अ.क्र.1 व 2 या मधील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकांच्या क्रिडा मार्गदर्शक यांना रुपये 10,000/- अनुदान.
- ✓ परिशिष्ट (क) अ.क्र.1 व 2 या मधील आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकांच्या क्रिडा मार्गदर्शक यांना रुपये 15,000/- अनुदान मंजुर करणेच्या उपसुचनेस ही सभा मंजुरी देत आहे.

क्रीडा मार्गदर्शक पात्रतेचे निकष:

1. खेळाडुचे/ मार्गदर्शकाचे महाराष्ट्र राज्यात सलग 15 वर्षे वास्तव तसेच (अधिवास दाखला) असणे आवश्यक आहे.
2. खेळाडुने राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये अधिकृत स्पर्धेमध्ये पदक संपादन करणे आवश्यक आहे. क्रीडा मार्गदर्शकांना प्रोत्साहनपर बक्षिसे देताना संबंधित खेळाडुंच्या मुळ क्रीडा मार्गदर्शकाचा विचार करण्यांत यावा. सदर क्रीडा मार्गदर्शक हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. तसेच पुरस्कारार्थी खेळाडुने त्याच्या मुळ क्रीडा मार्गदर्शकाचे नाव स्व:त प्रमाणित करून देणे आवश्यक आहे.
3. क्रिडा स्पर्धेत एकाच मार्गदर्शकाच्या प्रशिक्षणाअंतर्गत एका पेक्षा जास्त खेळाडू यांनी एकाच क्रीडा स्पर्धेत भाग घेवून त्या स्पर्धेमध्ये खेळाडू एका पेक्षा जास्त विजेता ठरल्यास तर देखील एका स्पर्धेच्या आधाराद्वारे क्रीडा मार्गदर्शक अनुदानास पात्र असेल.या उपसुचनेस ही सभा मंजुरी देत आहे.

सन 2017-18 च्या अर्थसंकल्पात खेळ व संघ दत्तक घेणेसह विविध स्पर्धांसाठी खेळ व संघानें प्रायोजकत्व स्विकारणे तसेच संघाना व खेळाडूंना व्यक्तीगत अर्थसहाय्य देणे या लेखाशिर्षखाली रुपये 1,00,00,000/- इतकी करण्यांत आलेली आहे. सदर कामी होणार खर्च प्रस्तावात नमुद लेखाशिर्षा अंतर्गत करणेंस ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या महापौर कार्यालयात व क्रीडा विभागात आजमितीस प्राप्त झालेले अर्जाबाबत निकष तपासून पुढील कार्यवाही करण्यास ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे. वरील प्रस्तावात नमुद नियमावली व त्याअनुसरुन द्यावयाचे अनुदान यासाठी तयार केलेले सर्वसाधारण नियम व अटी यांना अनुलक्षून महानगरपालिका हद्दीतून राज्य,राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय,व ऑलिम्पिक दर्जाचे पदक विजेते खेळाडू तयार होण्यास मदत होणार असल्याने सदर प्रस्तावात नमुद बाबींकरिता तसेच या प्रस्तावाच्या अनुषंगाने दाखल केलेल्या उपसुचनांचा या ठरावात अंतर्भाव करणेंस व त्याची अंमलबजावणी करणेंस याकामी होणाऱ्या खर्चास आजची ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**अनुमोदक :- (माया चौधरी ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**

**ठराव उपसुचनेसह सर्वानुमते मंजूर.**

| | | |
|---|---|---|
| ६. | प्रभाग समिती 'एफ' धानिव/पेल्हार क्षेत्रातील वालीव येथील वालीव मुख्य रस्ता ते बालाजी हार्डवेअर शॉप पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | प्रस्तावाचा निर्णय :- सदरच्या कामी येणाऱ्या रु. १,०२,१८,३९१/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी विहीत प्रणालीनुसार निविदा मागविणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७. | केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत महापालिका क्षेत्रातील नालासोपारा भागात भुयारी गटार योजना राबविणे कामास व खर्चास अर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव/निर्णय :- केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानात वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नालासोपारा भागासाठी मलनिःस्सारण योजना राबविणेस तसेच सदर कामी सन २०१७/१८ शासनाने मंजूर केलेल्या रु.१७० कोटी निधीच्या मर्यादेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत तांत्रिक सल्लागार म्हणुन सुरु असलेल्या कार्यवाहीस (DPR) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन तो शासनास पाठविण्यास व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास शासन निर्णयानुसार सल्लागार म्हणुन नियुक्तीस व त्यांचे ३% सेवा शुल्क शासनाने निश्चित केलेल्या शतमान पध्दतीने अदा करण्यास हि सभा मंजूरी देत असून सदर कामी पुढील सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त वसई विरारा शहर महानगरपालिका यांना प्रदान करण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- (रूपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्र अंतिम स्वरुपात "उघडयावर शौच मुक्त (ODF)" झाल्याचा अहवाल राज्य शासनास सादर करणेबाबत. | प्रस्तावाचा निर्णय :- वसई विरार शहर माहानगरपालिका कार्यक्षेत्रात प्राथमिक स्वरुपात (ODF) घोषीत करुन त्याबाबत नागरीकांच्या हरकती/सुचना मागविणेत आल्या असता नागरीकांकडून हरकती/सुचना प्राप्त न झाल्याने शहर अंतिम स्वरुपात (ODF) घोषीत करुन अहवाल राज्य शासनास सादर करणेस हि सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (रूपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात शहर अभियंता | ठराव / निर्णय : - वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागात शहर अभियंता या पदावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्रतिनियुक्तीवर सद्या कार्यरत असलेले श्री. माधव जवादे, अधिक्षक अभियंता यांनी महानगरपालिका सेवेत सामावून घेणेस विनंती केलेली आहे. श्री. जवादे यांना अधिक्षक अभियंता पदाचा ०९ वर्षाचा अनुभव आहे. त्यांची सद्याची |

| | | |
|---|---|---|
| | **या पदावर महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडून प्रतिनियुक्तीवर सध्या कार्यरत असलेले श्री. माधव जवादे, अधिक्षक अभियंता यांना महापालिका सेवेत कायम स्वरुपी सामावून घेणेबाबत.** | वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० अशी आहे. महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शहर अभियंत्याची तीन पदे मंजूर असुन, तीन्ही पदे रिक्त आहेत. सदर तीन पैकी एका पदावर श्री. जवादे यांना सामावून घेतल्यास त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा नगरोत्थान अंतर्गत वाढीव १०० द.ल.ली पाणी पुरवठा टप्पा-३ योजना, "अमृत" अभियानांतर्गत अतिरिक्त पाणी पुरवठा व वितरण व्यवस्था, मलनि:स्सारण इत्यादी योजना राबविण्यासाठी महानगरपालिकेस होणार आहे. सबब प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तीवर श्री. जवादे, अधिक्षक अभियंता यांना महानगरपालिकेच्या शहर अभियंता या मंजूर रिक्त पदावर सामावून घेण्यास आजची ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे. तरी याबाबतचा प्रस्ताव शासनास व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास पाठविण्यांत यावा.<br>**अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

नगरसचिव

वसई -विरार शहर महानगरपालिका